पुढारी MY सिंधुदुर्ग गुरुवार, ३१ मार्च २०२२



दोडामार्ग : समीर ठाकूर यांना प्रमाणपत्र देताना डॉ. प्रबीरकुमार रथ, विवेकानंद नाईक सोबत प्राचार्य.

# हळबे महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रबीरकुमार रथ, उद्योजक विवेकानंद नाईक उपस्थित होते.

डॉ. कबीरकुमार रथ म्हणाले, पदवी मिळाल्याबरोबर समाजातील जबाबदारीसुद्धा वाढलेली असते. त्यामुळे विद्यार्थ्यानि आपली वर्तणूक, समाजातील स्थान आणि जीवनशैली उत्तरोत्तर प्रगती पथावर न्यावी. विवेकानंद नाईक म्हणाले, पदवी मिळणे हा शिक्षणाचा अंतिम टप्पा नसून विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व रोजगाराची अनेक दालने खुली झाली आहेत. विद्यार्थ्यांनी रोजगारक्षम व्हावे, असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. एस. एस पाडगावकर, सूत्रसंचालन प्रा. प्रीती प्रसादी तर डॉ. एस. एन. जाधव यांनी आभार मानले.